दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 169 वा ■ रविवार, 13 सप्टेंबर 2026 ■ पाने 05 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com


**सुविचार**

आयुष्य सहज-सोपं जगायला
शिका, तरच ते सुंदर होईल






# पोषण आहारावरही आता एफडीएची नजर

## जिल्ह्यात शालेय पोषण आहाराची वर्षातून दोनदा होणार तपासणी

### पोषण आहाराची गुणवत्ता आता तपासणीच्या कक्षेत

### अन्न-औषध प्रशासनाकडून शाळांवर लक्ष






**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव जिल्ह्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शालेय पोषण आहाराच्या गुणवत्तेकडे आता अन्न व औषध प्रशासनाचे विशेष लक्ष राहणार आहे. विद्यार्थ्यांना मिळणारा आहार सुरक्षित, स्वच्छ आणि पौष्टिक असावा, यासाठी वर्षातून दोन वेळा आहाराची तपासणी करण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. या तपासणीत अन्नधान्याची गुणवत्ता, स्वच्छता, साठवणूक, स्वयंपाकाची पद्धत, पिण्याचे पाणी तसेच तयार अन्नाची सुरक्षितता यांची पाहणी केली जाणार आहे. अन्न-औषध प्रशासनाच्या ऑडिटमुळे शालेय पोषण आहार योजनेतील त्रुटींवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यास मदत होणार असून, धाराशिव जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना सुरक्षित व दर्जेदार आहार मिळण्यास हातभार लागणार आहे.

### अशी होणार तपासणी

**१) वर्षातून दोन वेळा होणार तपासणी**
**२) शालेय पोषण आहाराची गुणवत्ता तपासली जाणार**
**३) अन्नधान्य व कच्च्या मालाची पाहणी**
**४) स्वच्छता व सुरक्षिततेच्या नियमांची तपासणी**
**५) अन्न साठवणुकीच्या पद्धतीवर लक्ष**
**६) स्वयंपाकासाठी वापरण्यात येणाऱ्या पाण्याची गुणवत्ता तपासणी**
**७) तयार अन्नाच्या सुरक्षिततेची पाहणी**
**८) त्रुटी आढळल्यास सुधारणा करण्याच्या सूचना**

### 'ईट राइट स्कूल' उपक्रमावर भर

शाळांमध्ये विद्यार्थ्यांना सुरक्षित, पौष्टिक व सकस आहार मिळावा, यासाठी 'ईट राइट स्कूल' उपक्रमाच्या माध्यमातून अन्न सुरक्षा आणि आरोग्यदायी आहाराबाबत जनजागृती करण्यावरही भर दिला जाणार आहे. शाळांनी अन्न सुरक्षा मानकांचे पालन करणे, स्वच्छता राखणे आणि विद्यार्थ्यांना सकस आहार देण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे अपेक्षित आहे. मागील वर्षी धाराशिव जिल्ह्यातील काही शाळांच्या पोषण आहारात अळ्या सापडल्या होत्या. त्यामुळे शालेय पोषण आहाराच्या सुरक्षेच्या बाबतीत प्रश्न निर्माण झाले होते. एफडीए कडून नियमित तपासणी होणार असल्याने शालेय पोषण आहाराच्या गुणवत्तेवर आता बारीक लक्ष राहणार आहे.

धाराशिव जिल्ह्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शालेय पोषण आहाराच्या गुणवत्तेबाबत आता अधिक काटेकोरपणे देखरेख ठेवली जाणार आहे. शालेय पोषण आहार सुरक्षित व गुणवत्तापूर्ण राहावा, यासाठी अन्न व औषध प्रशासनाच्या माध्यमातून तपासणी व ऑडिट करण्यावर भर देण्यात येत आहे. वर्षातून दोन वेळा ही तपासणी होणार असून, आहार तयार करण्यापासून तो विद्यार्थ्यांना वितरित करण्यापर्यंतच्या प्रक्रियेची पाहणी केली जाणार आहे. शाळांमध्ये विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या पोषण आहारासाठी वापरण्यात येणाऱ्या धान्य, डाळी, तेल, मसाले व अन्य कच्च्या मालाची गुणवत्ता महत्त्वाची आहे. त्याचबरोबर अन्नधान्याची योग्य पद्धतीने साठवणूक केली जाते का, स्वयंपाकाच्या ठिकाणी स्वच्छता राखली जाते का, स्वच्छ पाणी वापरले जाते का, स्वयंपाक करणाऱ्या व्यक्ती स्वच्छतेचे नियम पाळतात का, याचीही तपासणी केली जाणार आहे. पोषण आहार तयार करताना स्वच्छता आणि सुरक्षिततेच्या नियमांचे पालन होणे आवश्यक आहे. तयार अन्न विद्यार्थ्यांना देण्यापूर्वी त्याची सुरक्षितता तसेच आहार वितरणाची पद्धत यावरही लक्ष दिले जाणार आहे. अन्नाच्या गुणवत्तेत त्रुटी आढळल्यास संबंधित यंत्रणेला आवश्यक त्या सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या जाणार आहेत. जिल्ह्यात शालेय पोषण आहाराची अंमलबजावणी करणाऱ्या शाळा, संस्था, बचत गट अथवा संबंधित यंत्रणांनी अन्न सुरक्षा नियमांचे पालन करणे अपेक्षित आहे. अन्न-औषध प्रशासनाच्या नियमित तपासणीमुळे पोषण आहार योजनेत अधिक शिस्त निर्माण होऊन विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने सुरक्षित वातावरण निर्माण होण्यास मदत होणार आहे.

# ग्रामपंचायत कार्यालयात रोजगार सेवकाच्या मुद्यावरून मारहाण

**आरंभ मराठी । शिराढोण**

रोजगार सेवकाला कायम ठेवण्याच्या मागणीवरून झालेल्या वादातून पश्चिम लोहटा येथील ग्रामपंचायत कार्यालयात एका ५५ वर्षीय व्यक्तीस शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी व दगडाने मारहाण केल्याची घटना घडली. याप्रकरणी शिराढोण पोलिस ठाण्यात आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विनोद सोमनाथ सावंत, अमोल आडसुळ, संभाजी जाधव, किरण आडसुळ, रोहन आडसुळ, सुमित आडसुळ, संजय आडसुळ व शंकर जाधव (सर्व रा. पश्चिम लोहटा, ता. कळंब) यांनी २५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास पश्चिम लोहटा येथील ग्रामपंचायत कार्यालयात फिर्यादी मधुकर रामराव आडसुळ (वय ५५) यांच्याशी वाद घातला. रोजगार सेवक गोविंद आश्रुबा सावंत यांना कायम ठेवण्यात यावे, या मागणीसाठी मधुकर आडसुळ यांनी हात वर केल्याचा राग मनात धरून संबंधितांनी गैरकायद्याची मंडळी जमवली. त्यानंतर फिर्यादीस शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी तसेच दगडाने मारहाण केली. या मारहाणीत ते जखमी झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी मधुकर आडसुळ यांनी शिराढोण पोलिस ठाण्यात दिलेल्या प्रथम खबरेवरून वरील आठ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), १८९(२), १९१(२), १९० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अल्पवयीन मुलीचे लग्न लावून दिल्याबद्दल गुन्हा दाखल

**भूम** :- एका १७ वर्षे ८ महिन्यांच्या अल्पवयीन मुलीचे अल्पवयीन असतानाच एका तरुणासोबत लग्न लावून दिल्याप्रकरणी भूम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात अल्पवयीन मुलीशी शारीरिक संबंध ठेवल्याने ती सध्या गर्भवती असल्याचे पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३० ऑक्टोबर २०२५ ते ८ सप्टेंबर २०२६ या कालावधीत पिंपळगाव (क) येथे हा प्रकार घडल्याचे फिर्यादीत नमूद आहे. मुलगी अल्पवयीन असतानाही आरोपींनी संगनमत करून तिचे एका तरुणासोबत लग्न लावून दिले. त्यानंतर संबंधित तरुणाने तिच्याशी शारीरिक संबंध ठेवल्याने ती गर्भवती झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणी पीडितेने ११ सप्टेंबर २०२६ रोजी भूम पोलीस ठाण्यात दिलेल्या प्रथम खबरेवरून भारतीय न्याय संहितेतील कलम ६४(२), बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ मधील कलम ९, १० व ११ तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक अधिनियम २०१२ मधील कलम ४, ६, ८ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# तलवार, कोयत्याने जमावाचा गावकऱ्यांवर हल्ला; २४ वर्षीय तरुण ठार

## बुकनवाडीत तुफान हाणामारी; पाच जण गंभीर जखमी, गावात तणावाचे वातावरण

**आरंभ मराठी । तेर**

धाराशिव तालुक्यातील बुकनवाडी येथे शुक्रवारी (दि.११) सायंकाळी धार्मिक कार्यक्रमादरम्यान दुचाकी चोरीच्या कारणावरून वादाचे रूपांतर तुफान हाणामारीत झाले. यावेळी तलवार, चाकू आणि कोयत्याने झालेल्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या महेश सुरेश चामे (वय २४) या तरुणाचा शनिवारी सकाळी सोलापूर येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेत आणखी पाच जण गंभीर जखमी झाले असून, त्यातील सतीश करण आवले यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. घटनेनंतर बुकनवाडी गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार बुकनवाडी येथे शुक्रवारी एका समाजाचा धार्मिक कार्यक्रम सुरू होता. याचदरम्यान गावातील एका व्यक्तीची दुचाकी चोरीला गेल्याचे समोर आले. ग्रामस्थांनी शोध घेतल्यानंतर संबंधित दुचाकी मिळून आली. मात्र, या घटनेनंतर गावात वाद निर्माण झाला आणि त्याचे रूपांतर हाणामारीत झाले. त्यानंतर जमावाने गावातील काही तरुणांवर अचानक तलवार, चाकू आणि कोयत्याने हल्ला केल्याचा आरोप मयत महेश चामे यांच्या नातेवाईकांनी केला आहे. या हल्ल्यात महेश चामे यांच्यासह मारुती परगे, काका परगे, नाना आवले, करण आवले आणि व्यंकट आवले हे गंभीर जखमी झाले. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, काही जखमींवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. महेश चामे यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी सोलापूर येथे हलविण्यात आले होते. मात्र, शनिवारी सकाळी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.घटनेनंतर बुकनवाडी परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. हल्ल्यात सहभागी असलेल्या आरोपींवर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी करीत ग्रामस्थ आक्रमक झाले.संबंधितांवर कारवाई होईपर्यंत तरूणाचा मृतदेह ताब्यात घेणार नसल्याची भूमिका गावकऱ्यांनी घेतली होती.दरम्यान गावकऱ्यांच्या आक्रमक भूमिकेनंतर पोलिस अधीक्षक रितू खोकर यांनी संबंधित आरोपींवर कठोर कारवाईचे आश्वासन दिले. काही आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे सांगणयात आले असले तरी आरोपींची नेमकी माहिती गावकऱ्यांना देण्यात आली नसल्याचे सांगण्यात येत आहे.

### निष्पापाचा बळी गेला, गावात हळहळ



गावात झालेल्या वादाची कल्पनाही नसलेला महेश चामे हा दूध घालण्यासाठी बाहेर गेला होता. अत्यंत शांत, संयमी कुणाच्याही वादात नसलेल्या महेशवर जमावाने तलवारीने हल्ला चढविला. काही कळण्याच्या आत महेश जागीच कोसळला. त्याच्या मृत्युने गावात हळहळ व्यक्त होत आहे.

# पावसासाठी तेरमध्ये मुस्लिम समाजाकडून विशेष नमाज अदा

**आरंभ मराठी । तेर**



गेल्या दीड महिन्यापासून पावसाने ओढ दिल्याने धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी हवालदिल झाला आहे. पावसाअभावी खरीप हंगामातील पिके धोक्यात आली असून शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. पिकांना पावसाची नितांत गरज असताना पावसाने दडी मारल्याने ग्रामीण भागात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर तेर येथील मुस्लिम समाज बांधवांनी एकत्र येत पावसासाठी विशेष नमाज अदा केली. शनिवारी सकाळी तेर येथील ईदगाह मैदानावर समाज बांधवांनी एकत्रितपणे नमाज पठण करून अल्लाहकडे पावसासाठी प्रार्थना केली. यावेळी पाऊस वेळेवर व मुबलक पडावा, शेतकऱ्यांच्या पिकांना जीवदान मिळावे आणि सर्वत्र सुख-समृद्धी नांदावी, अशी मनोभावे प्रार्थना करण्यात आली. पावसाअभावी शेतकरी संकटात सापडला असून लवकरात लवकर समाधानकारक पाऊस पडावा, अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

**आरंभ मराठी**

## शेकडो तरुणांचा सहभाग; सरकारविरोधी घोषणांनी परिसर दणाणला

# मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा; सिरसाव फाट्यावर बैलगाड्यांसह रस्ता रोको

**आरंभ मराठी । परंडा**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी परंडा तालुक्यातील सिरसाव फाटा येथे शुक्रवारी मराठा समाजाच्या वतीने बैलगाड्यांसह रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात परिसरातील शेकडो तरुण व ग्रामस्थ सहभागी झाले होते. मराठा आरक्षणाचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी करत आंदोलकांनी सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

सिरसाव फाटा येथील वारदवाडी-परंडा मार्गावर सकाळी ९ ते ११ वाजेपर्यंत सुमारे दोन तास रस्ता रोको करण्यात आला. आंदोलकांनी बैलगाड्या रस्त्यावर उभ्या करून वाहतूक रोखली. यामुळे या महत्त्वाच्या मार्गावरील वाहतुकीवर काही काळ परिणाम झाला. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाकडूनही कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मराठा आरक्षण हा समाजाचा हक्क असून सरकारने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून तातडीने निर्णय घ्यावा, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली. आरक्षणाचा प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित राहिल्याने समाजातील तरुणांमध्ये अस्वस्थता वाढत असून सरकारने केवळ आश्वासने न देता ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. आंदोलनादरम्यान 'आरक्षण आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या बापाचं', 'मनोज जरांगे पाटील, तू आगे बढो, हम तुम्हारे साथ है', 'एक मराठा, लाख मराठा' अशा घोषणांनी सिरसाव फाट्याचा परिसर दणाणून गेला. बैलगाड्यांसह रस्त्यावर उतरलेल्या आंदोलकांनी मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला आपला पाठिंबा असल्याचे स्पष्ट केले. मनोज जरांगे पाटील यांच्याकडून मुंबईकडे कूच करण्याचा आदेश मिळताच सिरसाव परिसरातील शेकडो ग्रामस्थ बैलगाड्या, ट्रॅक्टर तसेच उपलब्ध होईल त्या वाहनातून मुंबईकडे रवाना होणार असल्याचे आंदोलकांनी सांगितले. 'हे निष्ठूर सरकार मनोजदादांचा जीव घेणार आहे का?' असा सवालही यावेळी उपस्थित करण्यात आला.



### मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीला बैल बांधणार

आंदोलनावेळी 'मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीला बैल बांधणार' अशा घोषणाही देण्यात आल्या. या घोषणांमधून आंदोलकांनी सरकारविरोधातील तीव्र नाराजी व्यक्त केली. आरक्षणाच्या प्रश्नावर ठोस निर्णय होईपर्यंत आंदोलनाची धार कायम ठेवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी करण्यात आलेल्या या रस्ता रोकोमुळे सिरसाव फाटा परिसर काही काळ आंदोलनमय झाला होता. तसेच दोन तास वाहतूकही विस्कळीत झाली होती.



# खंडणीसाठी दहा हजार रुपयांची मागणी

## दुकानदाराला मारहाण करून ७,५०० रुपये बळजबरीने घेतले

**तुळजापूर** :- तुळजापूर शहरातील बागवान शॉपिंग सेंटरमध्ये कपडे शिवण्याचे काम करणाऱ्या व्यक्तीकडे दहा हजार रुपयांची खंडणी मागून, शिवीगाळ व लाथाबुक्यांनी मारहाण केल्याची घटना ११ सप्टेंबर रोजी दुपारी घडली. याप्रकरणी तुळजापूर पोलिस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ओमकार लक्ष्मीकांत भिसे व करण संतोष परदेशी (दोघे रा. तुळजापूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) हे ११ सप्टेंबर रोजी दुपारी एकच्या सुमारास बागवान शॉपिंग सेंटरमध्ये गेले. त्यावेळी तेथे कपडे शिवण्याचे काम करणारे संतोष विनायक जाधव (वय ४५, रा. ताकविकी, ता. जि. धाराशिव) यांच्याकडे आरोपींनी दहा हजार रुपयांची मागणी केली. यावेळी जाधव यांनी 'कशासाठी आणि का पैसे द्यायचे?' अशी विचारणा केली असता आरोपींनी त्यांना शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. यानंतर आरोपींनी जाधव यांच्या खिशातील ७ हजार ५०० रुपये बळजबरीने काढून घेतल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. या घटनेप्रकरणी संतोष जाधव यांनी तुळजापूर पोलिस ठाण्यात दिलेल्या प्रथम खबरेवरून ओमकार भिसे व करण परदेशी यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०८(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास तुळजापूर पोलिस करीत आहेत.

# ढोकीतील अतिक्रमणावर प्रशासनाचा बुलडोझर

## ४१ एकर शासकीय जमीन अतिक्रमणमुक्त; नागरिकांच्या आंदोलनाला अखेर यश

**आरंभ मराठी । ढोकी**

धाराशिव तालुक्यातील ढोकी येथील जिल्हा फळरोपवाटिकेच्या गट क्रमांक ३४ व ३५ मधील सुमारे ४१ एकर शासकीय जमिनीवरील अतिक्रमण अखेर प्रशासनाने हटविले. नागरिकांनी २ सप्टेंबरपासून सुरू केलेल्या बेमुदत साखळी उपोषणाची प्रशासनाने दखल घेत शनिवारी दि. १२ सप्टेंबर रोजी धडक कारवाई केली. कृषी, महसूल आणि पोलीस विभागाच्या संयुक्त पथकाने जेसीबी व ट्रॅक्टरच्या साहाय्याने सुमारे पाच तास कारवाई करून शासकीय जमीन अतिक्रमणमुक्त केली. ढोकी येथील जिल्हा फळरोपवाटिकेच्या जागेवरील अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी नागरिकांनी २ सप्टेंबरपासून बेमुदत साखळी उपोषण सुरू केले होते. आंदोलनाच्या पहिल्याच दिवशी ढोकी बंद ठेवण्यात आले होते. वारंवार पाठपुरावा करूनही कारवाई होत नसल्याने नागरिकांनी आंदोलनाची तीव्रता वाढविली. या आंदोलनाला सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींचाही पाठिंबा मिळाला होता. अखेर जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या नेतृत्वाखाली शनिवारी दुपारी १२ वाजता अतिक्रमण हटाव कारवाईला सुरुवात झाली. या कारवाईत १२ अधिकारी, सुमारे ९० पोलीस कर्मचारी, दोन जलद प्रतिसाद पथके तसेच कृषी विभागाचे सुमारे ४० कर्मचारी सहभागी झाले होते. जेसीबी आणि ट्रॅक्टरच्या मदतीने अतिक्रमण हटवून शासकीय जमीन मोकळी करण्यात आली.





### जानेवारी २०२५ मध्येही झाली होती कारवाई

विशेष म्हणजे याच जमिनीवरील अतिक्रमण जानेवारी २०२५ मध्येही प्रशासनाकडून हटविण्यात आले होते. मात्र, त्यानंतर पुन्हा अतिक्रमण झाल्याने नागरिकांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. यावेळी नागरिकांच्या आंदोलनाचा दबाव वाढल्यानंतर प्रशासनाने तातडीने कारवाई करत तब्बल ४१ एकर जमीन अतिक्रमणमुक्त केली.

### कायमस्वरूपी संरक्षणाची मागणी

अतिक्रमण हटविण्यात प्रशासनाला यश आले असले तरी भविष्यात पुन्हा या शासकीय जमिनीवर अतिक्रमण होऊ नये, यासाठी प्रशासनाने ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. अतिक्रमणमुक्त करण्यात आलेल्या जमिनीचे कायमस्वरूपी संरक्षण करावे, अशी मागणी आता ढोकीतील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेत शाहू मॉडर्न स्कूलचा सुवर्णवेध

## १४ व १७ वर्षे वयोगटातील खेळाडूंची लातूर जिल्हा संघाकडून दमदार कामगिरी




**आरंभ मराठी । पळसप**

मुरूड येथील श्री छत्रपती शाहू मॉडर्न इंग्लिश स्कूलने क्रीडा क्षेत्रातील आपला दबदबा पुन्हा एकदा सिद्ध केला आहे. कै. गोरोबा (काका) झाडके यांच्या ध्येयपूर्तीच्या विचारांनी मार्गक्रमण करणाऱ्या या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी कोल्हापूर येथे झालेल्या तेराव्या राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. स्टुडंट ऑलिंपिक असोसिएशनच्या वतीने कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या या राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेत लातूर जिल्हा संघाकडून शाहू मॉडर्न इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. १७ वर्षे वयोगटात सागर माळी, शिवम भंडारी, पृथ्वीराज साळुंके, अमरजीत समुद्रे व आदित्य फेरे यांनी, तर १४ वर्षे वयोगटात संकल्प नरवडे, अभय भांगिरे, रणवीर काळे व अमित मगर यांनी दमदार खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदकावर नाव कोरले. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या वतीने सर्व यशस्वी खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. खेळाडूंना क्रीडा शिक्षक राजेश बावळे व शिवराम सौंदरे यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष दीपक झाडके, सचिव प्रा. दत्तात्रय जाधव, कोषाध्यक्ष प्रा. शंकर पाटील, मुख्याध्यापिका विनू सेन, उपमुख्याध्यापक उमेश कुंभार व समन्वयक रामेश्वर शेटे यांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी आदित्य सिंग, उमेश मारकड, सौरभ चव्हाण, कमलेश सेन, रणजीत राऊत, सचिन मिश्रा, कैलास शेटे तसेच वैशाली देशमुख, शांती मार्डी, गीता फेरे, बबीता गिरी, अर्चना पाटील, ज्योती वांगसकर, संध्या माळी, प्रतीक्षा गौरशेटे, आकांक्षा लोमटे, अश्विनी नाडे, श्रीदेवी माशाळकर, संगीता बिटले, रुचिता इरपतगीरे, ज्योती ठेकणे, बबीता सिंग, सना पठाण, पूजा माने, रत्नप्रभा देशमुख, त्रिशाला कापसे, दीपाली शिंदे, श्रद्धा उपाडे, सोनाली सापसोड, जयश्री जाधव, रेश्मा कुंभार, उषा नाईकनवरे, पूजा चव्हाण, प्रियंका शिंदे तसेच शिक्षकेतर कर्मचारी व पालक उपस्थित होते.

# यशवंतराव चव्हाण विद्यालयातील विद्यार्थ्यांनी साकारल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती

## माती व शाडूच्या मातीपासून गणेशमूर्ती, बैल तयार; विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळाला वाव





**आरंभ मराठी । धाराशिव**

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या निर्देशानुसार पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून धाराशिव शहरातील यशवंतराव चव्हाण विद्यालय व सनराईज प्रायमरी इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थ्यांनी माती व शाडूच्या मातीपासून आकर्षक गणेशमूर्ती आणि बैल तयार केले. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने गणेशमूर्ती तयार करून त्यांना रंगरंगोटी केली. मूर्ती साकारताना विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचा आणि कलात्मक कौशल्याचा सुंदर अविष्कार पाहायला मिळाला. लालबागचा राजा, दगडूशेठ यांसह विविध स्वरूपातील गणेशमूर्ती विद्यार्थ्यांनी तयार केल्या.प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींमुळे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी नैसर्गिक साहित्याचा वापर करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. मूर्ती तयार करण्याच्या प्रत्यक्ष अनुभवासोबतच विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या उपक्रमासाठी अश्विनी सुरवसे, ललिता माडेकर, प्रतिमा बागल, आरती घुटे, पूजा कदम, राजश्री विभुते, मनीषा पवार, ज्ञानेश्वरी कामटे, सिद्धावा गुरव आणि अश्विनी दुरुगकर यांनी मार्गदर्शन व सहकार्य केले.

# श्री जयराम विद्यालयात मातीच्या गणेशमूर्ती साकारत विद्यार्थ्यांनी दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**आरंभ मराठी । नारंगवाडी**





उमरगा तालुक्यातील नारंगवाडी येथील श्री जयराम विद्यालयात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणपूरक मातीच्या गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा उत्साहात पार पडली. मुख्याध्यापक अजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत स्वतःच्या हाताने आकर्षक गणेशमूर्ती साकारल्या. मातीला विविध आकार देत विद्यार्थ्यांनी कलात्मक पद्धतीने गणेशमूर्ती तयार केल्या. त्यानंतर नैसर्गिक रंग व फुलांचा वापर करून या मूर्तींना आकर्षक रूप देण्यात आले. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींमुळे होणारे जलप्रदूषण टाळावे आणि गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करावा, याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. स्वतःच्या हाताने गणेशमूर्ती साकारण्याचा अनुभव विद्यार्थ्यांसाठी आनंददायी आणि प्रेरणादायी ठरला. यावेळी मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक अजय पवार यांनी गणेशोत्सव साजरा करताना पर्यावरणाची काळजी घेणे गरजेचे असल्याचे सांगितले. मातीच्या गणेशमूर्तींचा वापर करून जलप्रदूषण कमी करण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.कार्यशाळेनंतर विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या गणेशमूर्तींचे प्रदर्शन भरविण्यात आले. या मूर्तींचे शिक्षक व विद्यार्थ्यांनी कौतुक केले. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी गायकवाड आर. वाय., माळी के. बी., तोपले, हांडे, पोद्दार, गायकवाड एस. जी., कांबळे के. आर., हुग्गे, मुगळे यांच्यासह प्रशालेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# सरकारने प्रतिसाद न दिल्याने जरांगे पाटील 15 सप्टेंबरला समर्थकांसह मुंबईकडे निघणार

**आरंभ मराठी । जालना**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवली सराटी येथे २९ ऑगस्टपासून सुरू केलेल्या आमरण उपोषणाचा शनिवारी पंधरावा दिवस होता. राज्य सरकारकडून आंदोलनाची दखल घेतली जात नसल्याने अखेर जरांगे पाटील यांनी मुंबईकडे कूच करण्याची तारीख जाहीर केली. त्यामुळे पुन्हा एकदा लाखोंच्या संख्येने मराठा बांधव मुंबईकडे कूच करणार आहेत. येत्या १५ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता आंतरवली सराटी येथून लाखो मराठा आंदोलक मुंबईच्या दिशेने रवाना होणार असल्याची घोषणा त्यांनी केली. मनोज जरांगे पाटील यांनी यापूर्वी १२ सप्टेंबरपर्यंत सरकारने मराठा आरक्षणाच्या मागणीची दखल घेतली नाही, तर मुंबईकडे कूच करण्याचा इशारा दिला होता.



त्यानुसार शनिवारी राज्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने मराठा बांधव आंतरवली सराटी येथे दाखल झाले होते. यावेळी उपस्थित आंदोलकांना संबोधित करताना जरांगे पाटील यांनी मुंबईकडे जाण्याचा संपूर्ण कार्यक्रम जाहीर केला. जरांगे पाटील यांनी सांगितले की, १४ सप्टेंबर रोजी गणपतीची प्राणप्रतिष्ठा केल्यानंतर १५ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता आंतरवली सराटी येथून मुंबईकडे कूच करण्यात येईल. या आंदोलनासाठी पाच दिवसांचे नियोजन करण्यात आले असून, मार्गातील विविध ठिकाणी आंदोलकांचे मुक्काम असतील.

### असा असेल मुंबईकडे जाण्याचा मार्ग

१५ सप्टेंबर : आंतरवली सराटी येथून सकाळी १० वाजता प्रस्थान. पहिला मुक्काम बीड जिल्ह्यातील पाटोदा येथे.
१६ सप्टेंबर : दुसरा मुक्काम अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा येथे.
१७ सप्टेंबर : तिसरा मुक्काम पुणे शहरातील हडपसर येथे.
१८ सप्टेंबर : चौथा आणि शेवटचा मुक्काम रायगड जिल्ह्यातील खोपोली किंवा कोपरखैरणे येथे.
१९ सप्टेंबरपासून : मुंबईतील आझाद मैदानात आमरण उपोषण करण्याची घोषणा जरांगे पाटील यांनी केली आहे.

### लाखोंच्या संख्येने मुंबईला या

मराठा समाजातील जास्तीत जास्त बांधवांनी या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन जरांगे पाटील यांनी केले. गरीब मराठ्यांनी आपल्या हक्काच्या आरक्षणासाठी मुंबईच्या रस्त्यावर उतरावे, लाखोंच्या संख्येने वाहने घेऊन मुंबईकडे यावे, असे आवाहन त्यांनी केले. हे आंदोलन शांततेच्या मार्गाने करण्यात येईल, असे स्पष्ट करतानाच एका आंदोलकाला जरी मारहाण झाली, तरी त्याचे तीव्र पडसाद उमटतील आणि संपूर्ण महाराष्ट्र बंद पाडण्याचा इशारा त्यांनी दिला.

### महिलांनाही आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन

या आंदोलनात महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही जरांगे पाटील यांनी केले. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी जाऊन महिलांनी हळदी-कुंकवाचे कार्यक्रम घ्यावेत, असे आवाहन त्यांनी केले. तसेच विदर्भ आणि खानदेशातील मराठा समाजानेही आरक्षणाच्या या लढ्याला साथ द्यावी, असे त्यांनी सांगितले. यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री छगन भुजबळ तसेच जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्यावरही टीका केली. मराठा आरक्षणाच्या लढाईतील हा निर्णायक टप्पा असून, आता मागे हटण्याचा प्रश्नच नाही, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या या लढ्यात सर्व समाजाने सहभागी व्हावे, असे आवाहन करत जरांगे पाटील यांनी मुंबईतील आंदोलनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले.

**Sahyadri College of Nursing, Dharashiv (Osmanabad)**

First Year P.B. B.SC Nursing courses for the academic Year 2026-27 Applicants are invited from eligible candidates for admission to the first year P.B.B.Sc Nursing Courses for the academic Year 2026-27

**P.B.B.Sc Nursing**

| Intake | Eligibility |
|---|---|
| 50 | GNM,RGNM Pass |

**The Schedule for the admission process is shown below:**

| Schedule | First year P.B. B.sc Nursing |
|---|---|
| Issue of application form and prospects | 15 sept. 2026 10.00 am |
| Last day of filling of application form | 30 Sept. 2026 12.00pm |
| Display of Merit list | 30 Sept. 2026 2.00pm |
| Confirmation of admission by depositing fees and documents. | 30 Sept. 2026 (2.00pm to 5.30pm) |
| Cutoff date for all types of admission | 30 Sept. 2026 |

Detailed schedule is published on website: www.sahyadrinursing.com

The detailed schedule for the admission process is displayed on college notice board and college website
Interested students are required to visit college office between 10:00am To 5:30pm for fill the application form at the following address.

College address: 2nd Floor, Sahyaadrie multi-speciality hospital, DIC road, kakade plot dharashiv-413502 maharashtra

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-MAHMAR /2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
» पुणे कार्यालयः1012,विंग B, पूर्वांचल,विबग्योर स्कुलशेजारी » कोल्हापूर कार्यालयः रिव्हॉल्युशन, दुसरा मजला, दाभोळकर कॉर्नर, स्टेशन रोड, करवीर.

## विविध वृत्त

## उषाताई गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त उमरगा जि.प. हायस्कूलमध्ये दहा सायकलींचे वाटप



**आरंभ मराठी । उमरगा**

धाराशिव जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षा उषाताई गायकवाड यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलमधील गरीब व होतकरू विद्यार्थिनींना युवा सेनेचे मराठवाडा निरीक्षक तथा उमरगा नगराध्यक्ष किरण गायकवाड यांच्या वतीने दहा सायकलींचे वाटप करण्यात आले. शिक्षणासाठी घरापासून शाळेपर्यंतचा प्रवास सुलभ व्हावा आणि आर्थिक अडचणींमुळे विद्यार्थिनींच्या शिक्षणात अडथळा निर्माण होऊ नये, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक पद्माकर मोरे, नगरसेवक शफी चौधरी, युवा सेना जिल्हाप्रमुख तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व नगरसेवक सचिन जाधव, राहुल शिंदे, नगरसेविका आरती शिंदे, अश्विनी सोनकांबळे, प्रिया शरद पवार, सुप्रिया घोडके, स्वाती स्वामी, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सुजाता मोरे, विधानसभा संघटक शरद पवार, शहरप्रमुख योगेश तपसाळे, गोपाळ जाधव, प्रशांत स्वामी, विनोद कोराळे, शरद पवार, ज्ञानेश्वर सांगवे, अमर शिंदे, सिद्धार्थ सोनकांबळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी केले. सूत्रसंचालन भाग्यश्री पंडित यांनी केले, तर आभार सोनाली मुसळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धनराज तेलंग, बशीर शेख, विद्यानंद सुत्रावे, सोनाली मुसळे, सदानंद कुंभार, नागेश स्वामी, प्रवीण शिंदे, महादेव कुनाळे, वर्षा राणी पाटील, फजल शेख आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास युवा सेनेचे कार्यकर्ते, विद्यार्थी, शिक्षक व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भुसणी शाळेतील विद्यार्थ्यांनी साकारले पर्यावरणपूरक गणपती



**आरंभ मराठी । उमरगा**

उमरगा तालुक्यातील भुसणी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी इको फ्रेंडली गणपती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेला व सृजनशीलतेला वाव देत माती, कागद, शाडू माती तसेच विविध नैसर्गिक घटकांचा वापर करून सुंदर पर्यावरणपूरक गणपतीच्या मूर्ती साकारल्या. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या इको फ्रेंडली गणपतीचे शाळेचे मुख्याध्यापक गोविंद सोमवंशी यांच्या हस्ते पूजन करून स्वागत करण्यात आले. यावेळी शाळेतील उपक्रमशील शिक्षक अनिल जाधव यांनी पर्यावरणपूरक गणपतीचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. शाळेच्या वतीने उत्कृष्ट गणपती निर्मिती करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय, तृतीय तसेच उत्तेजनार्थ बक्षिसे देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेणाऱ्या सर्व विद्यार्थी व पालकांचेही अभिनंदन करण्यात आले. कार्यशाळेसाठी भुसणी केंद्राच्या केंद्रप्रमुख शिल्पा चंदनशिवे यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेचे मुख्याध्यापक गोविंद सोमवंशी हे प्रेरणास्थान ठरले. तसेच शिक्षिका तनुजा गाढवे, अनिता रांजणकर आणि शिक्षक संभाजी माळी, अनिल जाधव, विजय धोत्रेकर, रोहित गायकवाड, परमेश्वर साखरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## पावसासाठी तुळजापूरकरांचे तिरुपती बालाजीला साकडे



**तुळजापूर** :- पावसाळ्याचे तीन महिने उलटूनही अपेक्षित दमदार पाऊस न झाल्याने तुळजापूर तालुक्यासह धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. पावसाने दडी मारल्याने खरीप पिके करपून गेली असून, शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांवरील संकट दूर व्हावे आणि आगामी काळात चांगला पाऊस पडावा, यासाठी तुळजापूर शहरातील नागरिकांनी तिरुपती बालाजीला साकडे घातले. तुळजापूर येथील धैर्यशील दरेकर व त्यांच्या मित्र परिवाराच्या वतीने सुमारे ४० जण तिरुपती येथे गेले होते. यावेळी त्यांनी तिरुपती बालाजीचे दर्शन घेऊन धाराशिव जिल्ह्यासह तुळजापूर तालुक्यात चांगला पाऊस पडावा, अशी प्रार्थना केली.या संकटातून बळीराजाची सुटका व्हावी, शेतकऱ्यांचे झालेले नुकसान काही प्रमाणात भरून निघावे आणि आगामी रब्बी हंगामासाठी तरी पुरेसा पाऊस पडून शेतकऱ्यांना दिलासा मिळावा, यासाठी तिरुपती बालाजीच्या चरणी प्रार्थना करण्यात आली.

## शेतातील गवत-झुडपे काढण्याच्या कारणावरून वृद्धास मारहाण

**धाराशिव** :- शेतातील गवत व झुडपे काढून टाकण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून ७५ वर्षीय वृद्धास लाथाबुक्यांनी तसेच खोरे व कुऱ्हाडीच्या तुंब्याने मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना हिंगळजवाडी शिवारातील शेत गट क्रमांक १३९ येथे घडली. याप्रकरणी ढोकी पोलिस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हिंगळजवाडी येथील सुरेश शंकर वाकुरे (वय ७५) हे दि. ९ सप्टेंबर रोजी दुपारी शेत गट क्रमांक १३९ मध्ये असताना अभिजीत आगतराव वाकुरे, अजिंक्य आगतराव वाकुरे, आगतराव सोपान वाकुरे, अनिल उत्तम वाकुरे व प्रसाद अजिंक्य वाकुरे (सर्व रा. हिंगळजवाडी) यांनी तेथे गैरकायद्याची मंडळी जमवली.शेतातील गवत व झुडपे काढून टाकण्याच्या कारणावरून आरोपींनी सुरेश वाकुरे यांना शिवीगाळ केली. त्यानंतर लाथाबुक्यांनी तसेच खोरे व कुऱ्हाडीच्या तुंब्याने मारहाण करून त्यांना गंभीर जखमी केले. यावेळी आरोपींनी त्यांना जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेप्रकरणी सुरेश वाकुरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ढोकी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(२), ११५(२), ३५२, ३५१(२)(३), १८९(२), १९१(२), १९१(३) व १९० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास ढोकी पोलिस करीत आहेत.

## रोटरी क्लब ऑफ कळंब सिटीचा पर्यावरणपूरक उपक्रम

# चिमुकल्या हातांनी साकारले ३०० मातीचे गणपती बाप्पा

### शाडू मातीच्या गणेशमूर्ती घडवत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**आरंभ मराठी । कळंब**

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी रोटरी क्लब ऑफ कळंब सिटी यांच्या वतीने डिकसळ येथील श्री संत बोधले महाराज प्राथमिक विद्यामंदिर शाळेत 'आपला गणपती आपण बनवूया' या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी शाडू मातीच्या सुबक गणेशमूर्ती साकारल्या. पीओपीच्या मूर्तींमुळे होणारे जलप्रदूषण आणि मूर्तींची विटंबना रोखण्यासोबतच बालवयातच पर्यावरण रक्षणाचे संस्कार रुजविण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. मातीने हात, कपडे आणि गाल माखले तरी त्याची पर्वा न करता विद्यार्थी बाप्पाची मूर्ती घडविण्यात तल्लीन झाले होते.**





### नैसर्गिक रंगांचा वापर करा

पर्यावरणपूरक गणपती म्हणजे फक्त शाडू मातीची मूर्ती नव्हे. अनेकदा मूर्ती शाडूची असली तरी त्यावर रासायनिक ॲक्रेलिक रंग वापरले जातात, जे पर्यावरणासाठी हानिकारक आहेत. त्यामुळे मूर्ती तयार झाल्यावर तिला रंगवण्यासाठी गेरू, हळद, कुंकू, बुक्का, चंदन अशा नैसर्गिक रंगांचा वापर करावा. हे रंग मूर्तीला चिकटवण्यासाठी फेव्हिकॉलऐवजी नैसर्गिक डिंकाचा वापर करणे योग्य ठरते.

**विशाखा लिमकर**
**प्रशिक्षक.**

### बालवयातच पर्यावरण रक्षणाचे संस्कार

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची सुरुवात बालवयातच होणे आवश्यक आहे. 'आपला बाप्पा आपण बनवूया' यासारख्या कार्यशाळांमधून मुलांना पर्यावरणाचे महत्त्व कळते आणि त्यांच्यात एक चांगली सवय रुजते. हळूहळू या आवडीचे सवयीत रूपांतर होऊन एक पर्यावरणपूरक संस्कृती तयार होईल, याच उद्देशाने आम्ही ही कार्यशाळा आयोजित केली आहे.

**डॉ. सचिन पवार**
**प्रकल्प संचालक, रोटरी क्लब.**

रोटरी क्लब ऑफ कळंब सिटी यांच्या वतीने शनिवारी (दि.१२) डिकसळ येथील श्री संत बोधले महाराज प्राथमिक विद्यामंदिर शाळेत 'आपला गणपती आपण बनवूया' या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत तब्बल ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी शाडू मातीच्या सुबक गणेशमूर्ती साकारल्या. प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) मूर्तींमुळे होणारे जलप्रदूषण आणि मूर्तींची विटंबना रोखण्यासाठी लहान मुलांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून रोटरी क्लब ऑफ कळंब सिटीने या कार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कपड्यांवर आणि गालावर माती लागली तरी त्याची पर्वा न करता मुले मूर्ती बनवण्यात तल्लीन झाली होती. यावेळी व्यासपीठावर रोटरी क्लब ऑफ कळंब सिटीचे प्रकल्प संचालक डॉ. सचिन पवार, रोटेरियन संजय देवडा, धर्मेंद्र शहा, रवी नारकर, संजय काटे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रशिक्षक कु. विशाखा लिमकर यांनी विद्यार्थ्यांना गणपती बनवण्याचे सोप्या भाषेत प्रशिक्षण दिले. मुलांच्या असंख्य प्रश्नांना उत्तरे देत आणि त्यांच्या चुका दुरुस्त करत त्यांनी अत्यंत संयमाने मार्गदर्शन केले. मुलांचा उत्साह वाढवण्यासाठी शिक्षकांनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला. कार्यशाळेच्या अखेरीस, मुलांनी स्वतः तयार केलेल्या मूर्ती घरी नेताना त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद अवर्णनीय होता. हा आनंद पाहून शिक्षक आणि पालकांच्या चेहऱ्यावरही समाधान फुलले होते. स्वतःच्या हातांनी तयार केलेला बाप्पा घरी घेऊन जाण्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसून येत होता. त्यामुळे हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी केवळ गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा न राहता पर्यावरण रक्षणाचा प्रत्यक्ष अनुभव देणारा ठरला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक पोपट निकम, सहशिक्षक प्रदीप यादव, सज्जन बर्डे, किशोर वाघमारे, रमेश अंबिरकर, नामदेव झाडे, सुरज राऊत व शाळेतील विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत मुरूम कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलींचे यश

**आरंभ मराठी । मुरुम**




तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत भारत शिक्षण संस्था संचलित कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, मुरूम येथील मुलींनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद पटकावले. या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या कृतिका गोपाळ इंगोले, साक्षी सिद्धाप्पा कुंचगे, अपसाना गुंडु कुरणे, तेजस्विनी उमेश खजूरे आणि तस्लिम अलताफ जमादार यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. स्पर्धेदरम्यान खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्य, चिकाटी, आत्मविश्वास आणि सांघिक भावना दाखवत प्रतिस्पर्धी संघांवर मात केली. त्यांच्या सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर मुरूम कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलींनी तालुकास्तरीय स्पर्धेचे विजेतेपद आपल्या नावे केले. या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य गोविंद इंगोले, शिक्षकवृंद, क्रीडा विभागप्रमुख बालाजी इंगोले तसेच क्रीडाप्रेमींनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले. आगामी स्पर्धांमध्येही त्यांनी अशीच चमकदार कामगिरी करावी, यासाठी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

## तेरणा महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीची टीसीएसमध्ये निवड

### 'प्रोसेस असोसिएट – फार्माकोव्हिजिलन्स' पदावर नियुक्ती

**आरंभ मराठी । धाराशिव**





तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, उस्मानाबाद येथील फार्मसी विभागाची विद्यार्थिनी उजमा जलील शेख हिची मुंबई येथील नामांकित टीसीएस (TCS) कंपनीत 'प्रोसेस असोसिएट – फार्माकोव्हिजिलन्स' या पदावर निवड झाली आहे. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने तिचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. माने यांनी उजमा शेख हिचे अभिनंदन करून तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाने विविध नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांसोबत केलेल्या सामंजस्य करारांमुळे विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख प्रशिक्षण, इंटर्नशिप तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. विशेषतः मेडिकल कोडिंग आणि फार्माकोव्हिजिलन्स इंटर्नशिप कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना फार्मसी क्षेत्रातील आधुनिक औद्योगिक कार्यपद्धती, आवश्यक कौशल्ये आणि व्यावसायिक वातावरणाचा प्रत्यक्ष अनुभव मिळत आहे. या प्रशिक्षणाचा कु. उजमा शेख हिच्या टीसीएसमधील निवडीसाठी विशेष फायदा झाला. कु. उजमा शेख हिच्या निवडीसाठी महाविद्यालयाचे प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी डॉ. जी. बी. चिवटे आणि प्रा. अशोक जगताप यांनी विशेष मार्गदर्शन केले. तसेच प्रा. संदीप नालगे आणि प्रा. एन. एन. नाईकवाडी यांनी निवड प्रक्रियेदरम्यान मोलाची मदत व मार्गदर्शन केले.कु. उजमा जलील शेख हिच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. पद्मसिंह पाटील, महाराष्ट्र शासनाच्या मित्रा संस्थेचे उपाध्यक्ष व संस्थेचे विश्वस्त आमदार राणाजगजितसिंह पाटील, विश्वस्त मल्हार पाटील, संस्थेचे व्यवस्थापकीय समन्वयक प्रा. गणेश भातलवंडे, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थ्यांनी तिचे अभिनंदन केले.

आरंभ मराठी

## हेक्टरी एक लाखांच्या मदतीसाठी सरकारला आठ दिवसांचा अल्टिमेटम

# तुळजापुरात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा रास्ता रोको

**आरंभ मराठी । तुळजापूर**



धाराशिव जिल्ह्यात पावसाने पाठ फिरवल्याने खरीप हंगामातील पिके करपून गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. जिल्ह्यात भीषण कोरड्या दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली असून, बाधित शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची मागणी करत स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने तुळजापूर शहरातील जुन्या बसस्थानकासमोर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. मराठवाडा अध्यक्ष रविंद्र इंगळे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात शेतकरी व कार्यकर्त्यांनी सरकारविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. धाराशिव जिल्ह्याला तातडीने 'कोरडा दुष्काळग्रस्त क्षेत्र' घोषित करावे, बाधित शेतकऱ्यांना पिकांच्या नुकसानीपोटी हेक्टरी एक लाख रुपये सानुग्रह अनुदान द्यावे तसेच पीक विम्याची रक्कम मंजूर करावी, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली. सर्व राष्ट्रीयीकृत व सहकारी बँकांचे शेतकरी कर्ज पूर्णपणे माफ करून सक्तीची कर्जवसुली तात्काळ थांबवावी, शेतीपंपांना २४ तास अखंडित वीजपुरवठा करावा, प्रत्येक तालुक्यात जनावरांसाठी मोफत चारा छावण्या सुरू कराव्यात, टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी तसेच दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क माफ करावे, अशा मागण्याही संघटनेने केल्या. शासन व प्रशासन शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे उदासीनपणे पाहत असून, अद्याप शेतकऱ्यांपर्यंत कोणतीही ठोस मदत पोहोचलेली नाही. शासनाच्या या धोरणामुळे बळीराजा आर्थिक संकटात सापडला असून आत्महत्येच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे, असा आरोप रविंद्र इंगळे यांनी केला.

### आठ दिवसांत निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलन

शासनाने या मागण्यांची आठ दिवसांत गांभीर्याने दखल घेऊन हेक्टरी एक लाख रुपयांचे विशेष मदत पॅकेज जाहीर करावे. अन्यथा संपूर्ण धाराशिव जिल्ह्यात यापेक्षाही तीव्र व आक्रमक आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा रविंद्र इंगळे यांनी दिला. या आंदोलनात धनाजी पेदे, रघुनाथ भोजने, राजाभाऊ ढाके, शहाजी सोमवंशी, मकबुल मुल्ला, अक्षय साळुंके, अर्जुन बिरजदार, बळीराम जाधवर, विजय शिरसाट, संजोग भोसले, संजय नाना शितोळे, चंद्रकांत साळुंके, मंटु कदम, अरुण शेळके, विकास माळी, प्रकाश विकास माळी, रमेश गाडे, निलेश गाडे, नाना साळुंके, किशोर गंगाने, संतोष भोजने, विकास आवताडे, सुरेश कोळगे, प्रविण कदम, विकी परदेशी, सतीश डाके यांच्यासह बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.

# दुष्काळाची फक्त पाहणी करू नका, मदत जाहीर करा, शेतकऱ्यांची आर्त मागणी

## शेतीचा मसणवाटा झाला, मायबाप सरकार कधी जागे होणार ?

सूरज बागल । आरंभ मराठी

**तुळजापूर - गेल्या ४० ते ४५ दिवसांपासून तुळजापूर तालुक्यात पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगाम पूर्णपणे हातचा गेला असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. मोठ्या आशेने पेरलेली सोयाबीनसह विविध खरीप पिके पावसाअभावी अक्षरशः करपून गेली आहेत. पिकांसाठी बी-बियाणे, खते, औषधे आणि मशागतीवर लाखो रुपये खर्च करूनही शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच पडली आहे. सध्या लोकप्रतिनिधी व प्रशासनाकडून पाहणी दौरे सुरू असले तरी 'फक्त पाहणी नको, आता थेट मदत जाहीर करा', अशी संतप्त मागणी शेतकऱ्यांतून होत आहे. आगामी गौरी-गणपती, दसरा, दिवाळी या सणांच्या पार्श्वभूमीवर कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांची फी, वृद्ध आई-वडिलांचा दवाखाना यांसह वर्षभराचे आर्थिक नियोजन कसे करायचे, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. त्यामुळे शासनाने तात्काळ भरीव आर्थिक मदत जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.**

गेल्या ४० ते ४५ दिवसांपासून तुळजापूर तालुक्यात पावसाचा खंड पडल्याने संपूर्णपणे खरीप हंगाम हा शेतकऱ्यांचा निघून गेला असून आता आगामी काळात सणासुदीच्या दिवसांमध्ये काय करायचे असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. सध्या पाहणी दौरे जोरात सुरू आहेत. मात्र आता पाहणी नको, मदत द्या, अशी मागणी शेतकरी करत आहेत. पावसाळ्यामध्ये हिरवागार दिसणारे शिवार अक्षरशः मसणवाटा झालेले दिसून येत आहे. त्यामुळे सरकारने दखल घेऊन तात्काळ मदत देण्याची मागणी शेतकरी करत आहेत. यावर्षी तुळजापूर तालुक्यात ९० हजार हेक्टरवर सोयाबीनची पेरणी करण्यात आली होती. मोठ्या आशेने लाखो रुपयांचे बी-बियाणे शेतकऱ्यांनी खरेदी करून पेरणी केली. सुरुवातीच्या काही दिवसांत रिमझिम पावसावर ही पिके टिकून होती. मात्र ऑगस्ट महिना सुरू होताच पावसाने दडी मारली आणि उन्हाची तीव्रता वाढली. त्यामुळे शेतातील सर्व पिके सुकून गेली असून आता ही वाळलेली पिके शेतकऱ्याच्या कोणत्याही कामाची राहिलेली नाहीत. महागडी औषधे फवारणी करून लाखो रुपयांचा खर्च शेतकऱ्यांनी केला असून आगामी काळात गौरी-गणपती, दसरा, दिवाळी हे सण आहेत. मात्र आता हे सण साजरे कसे करायचे, असा प्रश्न शेतकऱ्यांना सतत पडत असून मायबाप सरकारने तात्काळ मदत करून शेतकरी जगवला पाहिजे, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.



### उद्योगपतींना हजारो कोटींची कर्जमाफी, शेतकऱ्यांना काय ?

काही दिवसांपूर्वीच देशातील एका मोठ्या उद्योगपतीला हजारो कोटींची कर्जमाफी देण्यात आली होती. मात्र जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकऱ्याला तुटपुंजी मदत देण्यासदेखील हात आखडता घेतला जात आहे. त्यामुळे शेतकरी आत्महत्या करणार नाही तर काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे. खरीप पिकामुळे शेतकऱ्याचे वर्षभराचे आर्थिक नियोजन होत असते. मात्र यावर्षी खरीप हंगाम हातचा गेल्याने आगामी वर्षभर आता कसे जगायचे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. अनेक शेतकऱ्यांना मुलांची फी, वृद्ध आई-वडिलांचा दवाखाना यासह इतर संकटे समोर उभी ठाकली आहेत. त्यामुळे आता सरकारने सढळ हाताने मदत करावी, अशी मागणी होत आहे.

### फक्त पाहणी काय कामाची ?

तुळजापूर तालुक्यात जिल्हाधिकारी, आमदार यांच्यासह पथकाने पाहणी केली आहे. मात्र तरीदेखील काही आजी-माजी जिल्हा परिषद, पंचायत समितीचे लोकप्रतिनिधी हे शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन पाहणी करत आहेत. मुळात अशा पाहणीची गरजच काय, असा प्रश्न निर्माण होत आहे. एकीकडे शेतकरी पुरता कोलमडून गेला असून आता पाहणी नको, मदत द्या, ही मागणी होत आहे. शेतातील सगळी पिके उन्हाने करपून गेली आहेत. तरीही कशाची पाहणी केली जात आहे असा प्रश्न शेतकऱ्यांना पडत आहे. पाहणी दौरे बंद करून तत्काळ मदत घोषित करावी अशी मागणी जोर धरत आहे.

### जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर

पाऊस नसल्याने मुक्या जनावरांच्या चाऱ्याचा व पाण्याचा प्रश्नही गंभीर होत असून चारा डेपो तसेच चारा छावणी सुरू करण्याची मागणी होत आहे. याबाबत शासनाकडून तात्काळ कारवाई करून जनावरांसाठी चारा डेपो व चारा छावणी करून पशुधन जगवण्यासाठी पावले उचलण्याची मागणी होत आहे. खरीप हंगाम तरी हातचा गेल्यानंतर रब्बी हंगामाची आशा आता शेतकऱ्यांना आहे. मात्र आता सोयाबीनचे क्षेत्र रिकामे करण्यासाठी शेतकऱ्यांना अजून खर्च करावा लागणार आहे. यासाठी रोटरद्वारे किंवा मजुरांद्वारे हे क्षेत्र रिकामे करून चांगला पाऊस पडल्यास निदान रब्बीची तरी पेरणी व्हावी, अशी प्रार्थना शेतकरी करत आहेत.

# येणेगूरमध्ये मध्यरात्री दोन किराणा दुकानांचे शटर उचकटून रोख रकमेसह साहित्य लंपास

आरंभ मराठी । येणेगूर

उमरगा तालुक्यातील येणेगूर येथील मराई चौकात मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी दोन किराणा दुकानांचे शटर उचकटून दुकानात प्रवेश केला. दुकानातील रोख रक्कम तसेच साहित्य चोरीला गेल्याची घटना घडली. एकाच रात्री दोन दुकाने फोडण्यात आल्याने परिसरात खळबळ उडाली असून व्यापारी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शंकर मायनाळे आणि योगेश जाधव यांच्या मालकीची ही दोन्ही किराणा दुकाने आहेत. मध्यरात्री दीडच्या सुमारास चोरट्यांनी दुकानांचे शटर उचकटून आत प्रवेश केला आणि दुकानातील रोख रक्कम व किराणा साहित्य घेऊन पोबारा केला. चोरीतील नेमकी रक्कम व साहित्याचा तपशील अद्याप स्पष्ट झालेला नाही. येणेगूर परिसरात गेल्या काही दिवसांपासून चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने व्यापाऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. अवघ्या महिनाभरापूर्वी शाकीर मकानदार यांच्या मोबाईल दुकानाचेही शटर उचकटून चोरी करण्यात आली होती. त्यावेळी दुकानातील मोबाईल चोरट्यांनी लांबविले होते. त्यानंतर आता पुन्हा दोन दुकाने एकाच रात्री लक्ष्य करण्यात आल्याने पोलिसांच्या रात्रीच्या गस्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.



### बंद सीसीटीव्हीचा चोरट्यांना फायदा

येणेगूर गावातील विविध चौकांमध्ये ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. मात्र, हे कॅमेरे सध्या बंद अवस्थेत असल्याने चोरट्यांना त्याचा फायदा होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित असते तर चोरीच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यास तसेच चोरट्यांचा माग काढण्यास मदत झाली असती, अशी प्रतिक्रिया व्यापाऱ्यांनी व्यक्त केली.

### व्यापारी महासंघाचे ग्रामपंचायत व पोलिसांना निवेदन

चोरीच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी येणेगूर व्यापारी महासंघाच्या वतीने ग्रामपंचायत आणि पोलिसांना निवेदन देण्यात आले आहे. बंद असलेले सर्व सीसीटीव्ही कॅमेरे तातडीने दुरुस्त करून ते प्रभावीपणे कार्यान्वित करावेत, अशी मागणी ग्रामपंचायत सरपंचांकडे करण्यात आली. तसेच येणेगूर पोलीस दूरक्षेत्राचे हेडकॉन्स्टेबल मिलिंद साखळे यांची भेट घेऊन गावात रात्रीच्या वेळी कायमस्वरूपी पोलीस गस्त सुरू करण्याबाबत चर्चा करण्यात आली. व्यापारी महासंघाचे निवेदन ग्रामपंचायतीचे उपसरपंच संदीप बिराजदार यांनी स्वीकारले. यावेळी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष दीपक हिप्परगे, प्रवीण चेडके, दयानंद संगशेट्टी, विवेकानंद हंगरगे, सतीश मुदकन्ना, विठ्ठल नांगरे, इरफान पटेल, विश्वनाथ गुंजोटे, योगेश मगरे यांच्यासह ग्रामस्थ व व्यापारी उपस्थित होते.

# तेर येथे कुणबी, मराठा-कुणबी नोंदीसाठी विशेष शिबिराला प्रतिसाद

आरंभ मराठी । तेर

महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार धाराशिव तालुक्यातील तेर महसूल मंडळातील गावांसाठी कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा नोंदीसाठी शुक्रवारी (दि.११) विशेष शिबिर घेण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा नोंदीसंदर्भातील पुरावे, अभिलेखे व आवश्यक कागदपत्रे उपलब्ध असलेल्या नागरिकांना अर्ज दाखल करता यावेत, यासाठी या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. संबंधित नागरिकांनी उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे नोंदीसाठी अर्ज दाखल केले. या शिबिरासाठी अपर तहसीलदार श्रद्धा चव्हाण, नायब तहसीलदार विशाखा बलकवडे, तेरचे मंडल अधिकारी शरद पवार, ग्राम महसूल अधिकारी महादेव कदम यांच्यासह राहुल बेशकराव हिंगळजवाडी, लक्ष्मण कांबळे कोळेवाडी, वर्षा मुळे काजळा, विशाल फासे किणी व आशुतोष देवगिरे वाघोली या ग्राम महसूल अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.



### १६ सप्टेंबर रोजी पुन्हा विशेष शिबिर

तेर महसूल मंडळातील गावांसाठी पुढील विशेष शिबिर बुधवार, दि. १६ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात येणार आहे. कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा नोंदीसंदर्भातील पुरावे व कागदपत्रे असलेल्या संबंधित नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन ग्राम महसूल अधिकारी महादेव कदम यांनी केले आहे.

तसेच तेर महसूल मंडळातील ग्रामपंचायत अधिकारी, कृषी सहायक, महसूल सेवक, पोलीस पाटील आणि नागरिक उपस्थित होते. महसूल विभागाच्या वतीने नागरिकांना नोंदीसंदर्भातील आवश्यक कागदपत्रे सादर करून अर्ज दाखल करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# प्रा. डॉ. इम्रान मोमीन यांना गृहराज्यमंत्र्यांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

आरंभ मराठी । तेर

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने आयोजित शिक्षण प्रेरणा महोत्सवात के. टी. पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, तेर येथील प्रा. डॉ. इम्रान मोईन अहमद मोमीन यांना शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आला. गृहराज्यमंत्री ना. योगेश कदम यांच्या हस्ते हा पुरस्कार देऊन डॉ. मोमीन यांचा गौरव करण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच व्यावसायिक विकासासाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी डॉ.



मोमीन यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा प्रतिष्ठेचा सन्मान देण्यात आला. शिक्षण क्षेत्रातील योगदानासोबतच विद्यार्थ्यांना सातत्याने मार्गदर्शन करून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेल्या कार्याचीही यावेळी प्रशंसा करण्यात आली. या कार्यक्रमास भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, व्यंकटराव गुंड, जय राजेनिंबाळकर तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रवीण एस. वक्ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. मोमीन यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष सुधीर पाटील, प्रशासकीय अधिकारी आदित्य पाटील, सचिव प्रेमाताई पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल जोशी, प्राध्यापक रामराजा उंबरे, श्रीमती गीता सपकाळे तसेच प्राचार्य सुधीर पांगे यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच त्यांच्या पुढील शैक्षणिक व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

दैनिक आरंभ मराठी | मातोश्रींना आर्थिक मदत; घरकुल व निराधार योजनेचा लाभ तातडीने देण्याच्या तहसीलदारांना सूचना

# प्रथमेश देशमुखच्या कुटुंबीयांची आमदार रोहित पवार यांनी घेतली सांत्वनपर भेट

आरंभ मराठी । परंडा

पुणे येथे दोन दिवसांपूर्वी आत्महत्या केलेल्या परंडा तालुक्यातील खासापुरी येथील एमपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्या प्रथमेश देशमुख यांच्या कुटुंबीयांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस तथा कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघाचे आमदार रोहित पवार यांनी शनिवारी सकाळी सांत्वनपर भेट घेतली. यावेळी पक्षाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील उपस्थित होते. आ. रोहित पवार यांनी प्रथमेशच्या मातोश्री व कुटुंबीयांशी संवाद साधून त्यांचे सांत्वन केले. या दुःखद प्रसंगी पक्ष त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा असल्याचा विश्वास त्यांनी दिला. यावेळी त्यांनी प्रथमेशच्या मातोश्रींच्या हाती आर्थिक मदतही सुपूर्द केली. कुटुंबीयांच्या परिस्थितीची माहिती घेतल्यानंतर आ. पवार यांनी परंड्याचे तहसीलदार निलेश काकडे




यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. प्रथमेशच्या मातोश्रींना घरकुल योजना तसेच निराधार योजनेचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने करण्याच्या सूचना त्यांनी तहसीलदारांना दिल्या. प्रथमेश अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगून एमपीएससीसह विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करीत होता. त्याच्या अकाली निधनाने कुटुंबीयांसह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांवरील वाढता मानसिक, शैक्षणिक आणि आर्थिक ताण गांभीर्याने विचारात घेण्याची गरज असल्याचे आ. पवार यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना पारदर्शक, विश्वासार्ह आणि कालबद्ध परीक्षा व्यवस्था उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असून, विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसाठी आम्ही सातत्याने रस्त्यावर उतरून आवाज उठवत आहोत. हा संघर्ष पुढेही सुरू राहील, असे आ. रोहित पवार यांनी स्पष्ट केले. या सांत्वनपर भेटीवेळी माजी आमदार सुनील भुसारा, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष फहाद अहमद, पंकजनाना बोराडे, रविकांत वरपे, जिल्हा सचिव सुहास ठोंगे, जिल्हा उपाध्यक्ष जोतीराम मिस्किन, तालुकाध्यक्ष किरण करळे, माजी सैनिक विभागाचे तालुकाध्यक्ष सुरेश कुंभार, युवक तालुकाध्यक्ष प्रवीण गरड, उपाध्यक्ष शिवाजी गायकवाड, युवक कार्याध्यक्ष सज्जन गाडगे, सोशल मीडिया जिल्हा उपाध्यक्ष दशरथ चाबुकस्वार, तालुकाध्यक्ष ऋषिकेश पाटील, ठवरे मेजर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारतीय जनता पार्टीच्या जिल्हा कार्यकारिणीची बैठक

## १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान 'सेवा संकल्प अभियान'



आरंभ मराठी । धाराशिव

भारतीय जनता पार्टी, धाराशिव जिल्हा कार्यकारिणीची बैठक माजी आमदार सुजितसिंह ठाकूर आणि जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. आगामी काळातील पक्ष संघटनेची वाटचाल, संघटनात्मक बांधणी तसेच विविध सामाजिक व सेवाभावी उपक्रमांच्या नियोजनाबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाच्या विविध आघाड्यांवर नवनियुक्त झालेल्या पदाधिकाऱ्यांचा तसेच धाराशिव जिल्हा कार्यकारिणीत नव्याने नियुक्त झालेल्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले आणि आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. दरम्यान, १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या 'सेवा संकल्प अभियानाची' माहिती जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी दिली. अभियानाचा उद्देश, त्याअंतर्गत राबविण्यात येणारे विविध सेवाभावी व सामाजिक उपक्रम तसेच अभियान यशस्वी करण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांची भूमिका याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. पक्षाची संघटनात्मक ताकद अधिक वाढविण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परस्पर समन्वय ठेवून जबाबदारीने काम करावे. तसेच आगामी काळात पक्षाचा जनाधार अधिक व्यापक करण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. बैठकीस अनिल काळे, नेताजी पाटील, नितीन भोसले, साहेबराव घुगे, गणेश खरसडे, अस्मिताताई कांबळे, धाराशिवच्या नगराध्यक्षा नेहाताई काकडे यांच्यासह जिल्ह्यातील भाजप पदाधिकारी, जिल्हा कार्यकारिणी सदस्य, विविध आघाड्यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गूळ पावडर नियंत्रण कायद्याच्या मसुद्यावर IJMA ची साखर आयुक्तांसोबत चर्चा



**आरंभ मराठी । पुणे**

महाराष्ट्र शासनातर्फे प्रस्तावित गूळ नियंत्रण कायद्याच्या मसुद्याच्या पार्श्वभूमीवर इनोव्हेटीव्ह जॅगरी मॅन्युफॅक्चर असोसिएशन (IJMA) च्या शिष्टमंडळाने पुणे येथे साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांची भेट घेऊन गूळ पावडर उद्योगासमोरील विविध प्रश्न व प्रलंबित मागण्यांवर सविस्तर चर्चा केली. संघटनेचे अध्यक्ष ॲड. व्यंकट गुंड पाटील यांच्या नेतृत्वाखाली ही भेट झाली. यावेळी आगामी गळीत हंगामाचे नियोजन, गूळ पावडर उद्योगाला डिस्टिलरी व इथेनॉल निर्मितीस परवानगी देणे, एफआरपी व एमएसपी यांसह विविध मागण्यांकडे शिष्टमंडळाने साखर आयुक्तांचे लक्ष वेधले. साखर उद्योगाच्या तुलनेत गूळ पावडर उद्योगाकडे शासनाकडून होत असलेल्या दुर्लक्षाचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. प्रस्तावित गूळ नियंत्रण कायद्यामुळे गूळ पावडर उद्योगावर होणारे संभाव्य परिणाम, उद्योगाच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या उपाययोजना तसेच साखर उद्योगाप्रमाणे गूळ पावडर उद्योगालाही विविध शासकीय योजनांचा लाभ मिळावा, अशी मागणी शिष्टमंडळाने केली. उद्योगावर अनावश्यक बंधने न आणता त्याच्या वाढीस चालना मिळेल, अशा पद्धतीने धोरणात्मक निर्णय घेण्याची अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली. गूळ पावडर नियंत्रण कायद्याच्या प्रस्तावित मसुद्याबाबत मागील आठवड्यात IJMA च्या शिष्टमंडळाने मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन संघटनेची भूमिका मांडली होती. या विषयावर सकारात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिल्याचे यावेळी सांगण्यात आले. बैठकीचे प्रास्ताविक संघटनेचे तज्ज्ञ संचालक प्रवीण प्रजापती यांनी केले. यावेळी उपाध्यक्ष विजय नाडे, संजय खरात, एकनाथ चाळक, ओंकार खुरपे, ऋषिकेश काळे, दिलीप उढाण आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# नीट परीक्षेत चमकदार यश मिळविणाऱ्या पारस कंदले याचा काँग्रेसकडून सत्कार



**आरंभ मराठी । धाराशिव**

नीट परीक्षेत ओबीसी प्रवर्गातून ऑल इंडिया रँक २४७ मिळवून उल्लेखनीय यश संपादन करणारे धाराशिव जिल्ह्याचे सुपुत्र पारस महावीर कंदले यांचा शुक्रवारी जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने काँग्रेस भवन येथे सत्कार करण्यात आला. पारस कंदले यांनी मिळविलेल्या या यशामुळे धाराशिव जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्राची मान उंचावली आहे. त्यांचा AIIMS ऋषिकेश येथे वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश निश्चित झाला असून, देशातील नामांकित वैद्यकीय संस्थांपैकी एक असलेल्या या संस्थेत शिक्षण घेण्याची संधी त्यांना मिळाली आहे. पारस यांचे वडील महावीर कंदले हे कुमाळवाडी प्राथमिक आरोग्य उपकेंद्र येथे आरोग्य कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत, तर आई सुनीता कंदले या जिल्हा परिषद शाळा, सारोळा बुद्रुक येथे शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. मुलाच्या शिक्षणासाठी पालकांनी घेतलेल्या मेहनतीचे आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित म्हणून पारसचे हे यश पाहिले जात आहे. जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष उमेश राजेनिंबाळकर यांच्या हस्ते पारस कंदले यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, धाराशिवचे संचालक मेहबूब पाशा पटेल तसेच दिलदार लायक अली पटेल यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी पारस यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वैद्यकीय शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

# आपसिंग्याच्या सरपंचासह पाच जणांचा शिवसेनेत प्रवेश

## खासदार ओमराजे निंबाळकर यांच्याकडून पक्षात स्वागत



**आरंभ मराठी । धाराशिव**

तुळजापूर तालुक्यातील आपसिंगा येथील सरपंच अजित क्षीरसागर यांच्यासह सुधीर सोनवणे, अभिजीत तोडकरी, संतोष सगरे आणि दीपक थोरात यांनी खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला. पक्षप्रवेशानंतर उपस्थित मान्यवरांनी नवनियुक्त शिवसैनिकांचे स्वागत केले. खासदार ओमराजे निंबाळकर यांनी त्यांच्या पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी युवा नेते ऋषिकेश मगर, सोमनाथ गुरव, काठीचे सरपंच सुजित हंगरकर, गोपाळ सुरवसे आणि अण्णा तनमोर यांची उपस्थिती होती.

# भोसले हायस्कूलमध्ये ४०० विद्यार्थ्यांनी बनवल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती



**आरंभ मराठी । धाराशिव**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने शहरातील श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याची कार्यशाळा घेण्यात आली. इयत्ता पाचवीतील सुमारे ४०० विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवत स्वतःच्या हाताने आकर्षक गणेशमूर्ती साकारल्या. संस्कार भारती धाराशिव समितीच्या अंजली शेटे-विळेगावे यांनी विद्यार्थ्यांना मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण दिले. कार्यशाळेनंतर प्रशालेचे मुख्याध्यापक नंदकुमार नन्नवरे, कार्यशाळा प्रमुख व्ही.एल. पवार व पर्यवेक्षक शेषनाथ वाघ यांच्या हस्ते सौ. अंजली शेटे-विळेगावे यांचा शाल, सन्मानचिन्ह व गुरुवर्य के.टी. पाटील यांचे पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य संतोष घार्गे, कैलास कोरके, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम, पर्यवेक्षिका सौ. बी.बी. गुंड, पर्यवेक्षक के.के. पाटील, बी.एम. गोरे, कलाध्यापक शिवाजी भोसले आदी उपस्थित होते. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी सहशिक्षक ए.व्ही. शेंडगे, ए.एच. माने, एन.सी. देशमुख, एम.एस. पाटील, एच.व्ही. माळी, मुंडे, सौ. पी.डी. परतापुरे, सौ. एस.व्ही. लोकरे, सौ. पी.एस. मोरे, सौ. एस.एम. राऊत, सौ. एस.डी. बीरगड तसेच सेवक महादेव काळे, दत्ता वाडकर, प्रशांत जाधव आदी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# प्रथमेशच्या श्रद्धांजली सभेला हजारो विद्यार्थ्यांची उपस्थिती



**आरंभ मराठी । परंडा**

पुणे येथे एमपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्या परंडा तालुक्यातील दिवंगत प्रथमेश दिलीप देशमुख याला परंडा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे विद्यार्थी, नागरिक व मित्रपरिवाराच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रथमेशच्या अकाली निधनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या श्रद्धांजली सभेला तालुक्यातील विद्यार्थी, नागरिक व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. प्रथमेश देशमुख हा तरुण शासकीय सेवेत जाण्याचे स्वप्न उराशी बाळगून पुणे येथे एमपीएससी परीक्षेची तयारी करीत होता. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची असतानाही त्याने शिक्षणासाठी सुमारे अडीच लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. त्यातच पावसाअभावी सोयाबीनचे पीक वाया गेल्याने त्यांच्या कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले होते. अशा प्रतिकूल परिस्थितीतही प्रथमेशने स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून उज्ज्वल भवितव्य घडविण्याचा प्रयत्न सुरू ठेवला होता. प्रथमेशच्या अकाली निधनानंतर श्रद्धांजली सभेत विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोरील आर्थिक व मानसिक अडचणींचा मुद्दा उपस्थित केला. वाढती स्पर्धा, शिक्षणाचा वाढता खर्च, कर्जाचा बोजा आणि योग्य मार्गदर्शनाचा अभाव यामुळे विद्यार्थ्यांवर मोठा ताण निर्माण होत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. यावेळी विद्यार्थी व नागरिकांनी प्रथमेश यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या अकाली निधनाने मित्रपरिवार, विद्यार्थी आणि नागरिक भावूक झाले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी, मानसिक ताण आणि आर्थिक परिस्थितीकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# महाडीबीटीवरील प्रलंबित अर्जांसाठी १५ सप्टेंबर अंतिम मुदत

**आरंभ मराठी । धाराशिव**

अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे महाडीबीटी पोर्टलवरील प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी १५ सप्टेंबर २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. सन २०१९-२० ते २०२५-२६ या कालावधीतील प्रलंबित अर्जांचा संबंधित महाविद्यालयांनी तातडीने निपटारा करावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त सचिन कवले यांनी केले आहे. राज्य शासनाच्या सुधारित धोरणानुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून महाडीबीटी प्रणालीचे व्हर्जन २.० कार्यान्वित झाले आहे. मात्र, जुन्या प्रणालीवरील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे अनेक अर्ज प्रलंबित आहेत. हे अर्ज निकाली काढण्यासाठी महाडीबीटी १.० पोर्टल १५ सप्टेंबरपर्यंत सक्रिय ठेवण्यात आले आहे. महाविद्यालयांनी आवश्यक सर्व रिपोर्ट तपासून पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहित मुदतीत निकाली काढावेत. अर्ज प्रलंबित राहिल्यास किंवा चुकीच्या अर्जांना मंजुरी दिल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या कामाला 'सर्वोच्च प्राधान्य' देऊन कार्यवाही पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. चुकीच्या मंजुरीमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची जबाबदारी राहील, असेही सहायक आयुक्त सचिन कवले यांनी स्पष्ट केले.

# आकृतीबंधाला विरोध नेमका कोणाच्या हितासाठी

## आकृतीबंधावरून कृषी विभागात वाद; निष्पक्ष चौकशीची मागणी

**आरंभ मराठी । धाराशिव**

कृषी विभागाच्या आकृतीबंधाला मंत्रिमंडळाने ११ ऑगस्ट २०२६ रोजी मान्यता दिलेली असताना काही स्वयंघोषित संघटनांकडून त्यास विरोध करण्यासाठी आंदोलन करण्यात आले. दि. ७ सप्टेंबर रोजी कृषी आयुक्तालय, पुणे येथे सामूहिक रजा, धरणे व लक्षवेधी आंदोलन करून शासनाच्या निर्णयावर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य कृषी विभाग प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी संवर्ग संघटना, पुणे यांनी केला आहे. आकृतीबंधाला विरोध नेमका कृषी विभागाच्या हितासाठी आहे की काही विशिष्ट व्यक्ती अथवा संवर्गाच्या हितासाठी, असा सवाल संघटनेने उपस्थित केला आहे. कृषी विभागाचा आकृतीबंध हा कोणत्याही एका अधिकाऱ्याने किंवा लिपीक संवर्गाने तयार केलेला नसून, प्रशासकीय प्रक्रियेतून तसेच संबंधित वरिष्ठ अधिकारी व विविध संवर्गांचा विचार करून तयार करण्यात आलेला आहे. त्यामुळे आकृतीबंधाचा कर्ता म्हणून लिपीक संवर्गाला लक्ष्य करणे आणि प्रसारमाध्यमे व सामाजिक माध्यमांतून आस्थापना सहसंचालक राजेश जाधव यांच्यावर वैयक्तिक आरोप करणे चुकीचे असल्याचे संघटनेने म्हटले आहे. शासनाच्या निर्णयावर आक्षेप असल्यास तो नियमबद्ध पद्धतीने मांडण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. मात्र आंदोलन, माध्यमांतील आरोप आणि सामाजिक माध्यमांवरील प्रचाराच्या माध्यमातून मंत्रिमंडळाच्या निर्णयावर दबाव आणण्याचा प्रयत्न होत असल्यास त्याची प्रशासकीय पातळीवर दखल घेणे आवश्यक आहे, अशी मागणी संघटनेने केली आहे. आकृतीबंध चुकीचा असल्याचा दावा करणाऱ्या संघटनांनी केवळ विरोध न करता कोणते पद चुकीचे आहे, कोणते पद कमी झाले आहे, कोणत्या कामासाठी किती मनुष्यबळ आवश्यक आहे, कोणत्या नियमाचा भंग झाला आहे आणि प्रस्तावित आकृतीबंधामुळे शासनावर किती आर्थिक भार पडणार आहे, याची अधिकृत आकडेवारी व कागदपत्रे शासनासमोर सादर करावीत, असेही संघटनेने म्हटले आहे.

**आरंभ मराठी** मुदत संपूनही काम पूर्ण नाही; कंत्राटदाराला वारंवार नोटिसा, कारवाई मात्र कागदावरच

# लोहारा नगरपंचायतीचा एक कोटींचा वॉकिंग ट्रॅक अर्धवटच; 40 लाखांचे बिल अदा

**आरंभ मराठी । लोहारा**

लोहारा शहरातील नागरिकांना एकाच ठिकाणी चालणे, व्यायाम तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा व आसन व्यवस्था उपलब्ध व्हावी, या उद्देशाने लोहारा नगरपंचायतीच्या मालकीच्या सर्व्हे नंबर १२० मधील, कै. भानुदास चव्हाण महाविद्यालयाच्या शेजारी सुमारे एक कोटी रुपये खर्चून वॉकिंग ट्रॅक व विविध व्यायाम सुविधा उभारण्याचे काम हाती घेण्यात आले. मात्र, कामाची मुदत संपूनही हे काम अद्याप अर्धवट अवस्थेत असून, झालेल्या कामाच्या मोबदल्यात सुमारे ४० लाख रुपयांचे बिल अदा झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे नागरिकांसाठी प्रस्तावित सुविधा प्रत्यक्षात कधी उपलब्ध होणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या कामाचा ठेका अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी येथील एका ठेकेदाराला देण्यात आल्याचे सांगण्यात येते. कामाची निर्धारित मुदत संपल्यानंतरही प्रकल्प पूर्ण झालेला नाही. कामाचा काही भाग करण्यात आला असून, त्यातील काही काम निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून होत आहे. नगरपंचायत प्रशासनाकडून संबंधित कंत्राटदाराला काम पूर्ण करण्याबाबत तसेच करारातील अटींचे पालन करण्यासाठी अनेक नोटिसा दिल्या. मात्र, नोटिसांनंतरही प्रत्यक्ष कामाला अपेक्षित गती मिळालेली नसल्याचे चित्र आहे. शहरातील नागरिकांना नियमित व्यायाम, चालणे आणि ज्येष्ठ नागरिकांना विरंगुळ्यासाठी स्वतंत्र सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने नगरपंचायतीच्या मालकीच्या जागेत हा प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला होता. त्यासाठी तब्बल एक कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली. मात्र, निधीची तरतूद होऊनही मुदत संपल्यानंतर प्रकल्प अपूर्ण राहिल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.



## दहा कामे मुदत संपूनही अर्धवट

लोहारा नगरपंचायतीने संबंधित कंत्राटदाराकडे जवळपास दहा कामे सोपविल्याची माहिती असून, त्यापैकी अनेक कामे मुदत संपूनही पूर्ण झालेलीनसल्याचाआरोपनागरिकांकडूनकरण्यातयेतआहे.काहीकामांना सुरुवात करून ती अर्धवट सोडण्यात आली असून, संबंधित कंत्राटदार प्रशासन व नागरिकांच्या संपर्कात नसल्याची चर्चाही शहरात आहे.

# जात वैधता प्रमाणपत्रासाठी स्वतंत्र अधिकारी द्या

## डॉ. प्रतापसिंह पाटील यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**आरंभ मराठी । धाराशिव**

विद्यार्थ्यांना शिक्षण, महाविद्यालयीन प्रवेश, शिष्यवृत्ती तसेच विविध शैक्षणिक प्रक्रियांसाठी जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक असते. मात्र, जात वैधता प्रमाणपत्राच्या कामकाजासाठी सध्या एका अधिकाऱ्याकडे एकापेक्षा अधिक जिल्ह्यांचा कार्यभार असल्याने जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्र प्रक्रियेला विलंब होत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जात वैधता प्रमाणपत्र वेळेत मिळत नसल्याने विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेसह शिष्यवृत्ती आणि पुढील शैक्षणिक संधींवर परिणाम होण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी जात वैधता प्रमाणपत्राच्या कामकाजाकरिता स्वतंत्र पूर्णवेळ अधिकारी नियुक्त करावा, तसेच कार्यालयासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रक्रियेत होणारा विलंब हा विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित गंभीर विषय आहे.



विशेषतःमहाविद्यालयीन प्रवेशाच्या अंतिम मुदती, शिष्यवृत्ती अर्ज तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी हे प्रमाणपत्र आवश्यक असल्याने प्रशासनाने या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे. स्वतंत्र पूर्णवेळ अधिकारी आणि पुरेसे कर्मचारी उपलब्ध झाल्यास प्रलंबित प्रकरणांचा जलदगतीने निपटारा होण्यास मदत होईल. त्यामुळे विद्यार्थी व पालकांना मोठा दिलासा मिळू शकतो. जिल्हाधिकारी यांनी संबंधित विभागाशी समन्वय साधून धाराशिवसाठी स्वतंत्र अधिकारी नियुक्त करण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी आणि विद्यार्थ्यांना वेळेत जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी केली आहे